क्रमांक :- ५७

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

### दिनांक १७ जून, २०२० / ज्येष्ठ २७, १९४२ शके

### संदर्भ :- या सचिवालयाचे पत्रक भाग दोन क्र.५१, दिनांक ८ मे, २०२०

५७. सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, बुधवार, दिनांक १० जून, २०२० रोजी विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार विधानसभेचे सोमवार, दिनांक २२ जून, २०२० रोजी पासून सुरु होणारे पुर्वनियोजित आगामी तृतिय (पावसाळी) अधिवेशन आता सोमवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२० रोजी पासून विधानभवन, मुंबई येथे होणार आहे. पुर्वनियोजित अधिवेशनासाठी दिनांक ८ मे, २०२० रोजी निर्गमित करण्यात आलेल्या तारांकित प्रश्नांच्या चक्रानुक्रमानुसार या सचिवालयाकडे प्राप्त झालेल्या प्रश्नांपैकी सोमवार दिनांक २२ जून, २०२० ते शुक्रवार, दिनांक ३ जुलै, २०२० या कालावधीकरिता यापूर्वीच विभागाकडे पाठविण्यात आलेले सर्व तारांकित स्वीकृत प्रश्न आता फेरविचारांती अतारांकित स्वीकृत करण्यात आले आहेत. उक्त अतारांकित प्रश्नांच्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांचे समाधान न झाल्यास त्याच विषयावर सदस्यांना आगामी अधिवेशनात नव्याने तारांकित प्रश्नसूचना देता येतील. उर्वरित सर्व प्रश्नसूचना व्यपगत करण्यात आल्या आहेत. व्यपगत झालेल्या प्रश्नांच्या फेरसूचना देखील सदस्यांना आगामी अधिवेशनाकरीता देता येतील.

**विधान भवन,**
मुंबई.
दिनांक : १७ जून, २०२०

**राजेन्द्र भागवत,**
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा

**याची प्रत :**

(१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष
(३) संगणक कक्ष (Website)